# <u>नियमित दि.दावा क्र. २३४/२०२१ मधील नि. १४ वरील आदेश</u>.

(**CNR–MHAH** २३–०००५२८–२०२१)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अर्जात कथन केले आहे की, त्यांना कैफीयत दयावयाची आहे, परंतु ते आजारी असल्यामुळे तसेच कोव्हीड–१९ मुळे त्यांना मुदतीत कैफीयत व म्हणणे देणे शक्य झाले नाही. त्यांनी कैफीयत देण्यास जाणुनबुजून विलंब केलेला नाही. कैफीयत न स्वीकारल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे त्यांचेविरुध्द झालेला विना कैफीयत आदेश रद्द होवून कैफीयत स्वीकारण्यात यावी असे प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कथन आहे.

३. वादींनी त्याच अर्जावर म्हणाणे देवून अर्जास विरोध केला. वादीचे कथनानुसार, विलंबाबाबत अर्जात नमूद केलेले कारण खरे नाही. पुर्ण संधी असतानाही विहित मुदतीत प्रतिवादींनी कैफीयत दिलेली नाही. अर्ज खोटा असल्याने तो नामंजूर करण्यात यावा असे वादीचे कथन आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. १ व २ यांना दिनांक ०७/०९/२०२१ रोजी दावा समन्स बजावणी झाली आहे. तेंव्हापासून ३० दिवसांत अगर जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफीयत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, प्रतिवादी यांनी दिनांक २४/११/२०२१ रोजी दिलेला कैफीयत मुदतीचा अर्ज नामंजूर झालेला आहे. दिनांक २९/१०/२०२१ रोजी प्रतिवादींविरुध्द विना कैफीयतचा आदेश झालेला आहे. प्रस्तुत अर्ज दिनांक ०३/१२/२०२१ रोजी दाखल आहे. यावरुन कैफीयत दाखल करण्यास ३४ दिवसांचा विलंब झाला असल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुत दावा निरंतर मनाई आदेश मिळणेसाठी दाखल झाला आहे. त्यामुळे कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. अर्ज नामंजूर झाल्यास नवीन प्रकरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत प्रकरण नि. ५ येथील तुर्तातुर्त मनाई अर्जाचे युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे अर्ज मंजूर झाल्यास दाव्याचे स्थितीवर विशेष विपरित परिणाम होणार नाही. सबब, प्रतिवादींवर खर्च बसवून अर्ज मंजूर करणे संयुक्तिक ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी, पुढील तारखेस अगर तत्पुर्वी वादींना रक्कम रु. १००/– खर्च दण्याचे अटीवर, नि. १४ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वरील आदेशानुसार पुर्तता केल्यावर त्यांची कैफीयत वाचुन नोंदविण्यात येईल.

श्रीगोंदा.
दिनांक ०३/१२/२०२१.

**( जी. एम. साधले )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.